

मुंबईतील पहिल्या भुयारी मेट्रोच्या बांधकामात वापरण्यात आलेल्या तंत्रज्ञानाच्या आविष्काराने शाळकरी विद्यार्थ्यांनाही भुरळ घातली आहे. हा मार्ग कसा बांधला गेला? याची माहिती देणारे प्रदर्शन एनसीपीएच्या पिरामल गॅलरीत भरवण्यात आले आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थ्यांची गर्दी होत आहे. पालिका शाळेतील ५०० विद्यार्थ्यांनी आणि २० शिक्षकांनी प्रदर्शनाला भेट दिली. मेट्रोचे काम पाहून आश्चर्यचकित झाले, अशी प्रतिक्रिया कुलाब्याच्या 'एमपीएस'शाळेच्या शिक्षिका जयश्री पटेल यांनी व्यक्त केली.